महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय**

**पार्श्वनाथ९ इमारत, बिडको नाका, दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११**
**नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर** **Email ID : collectorpalghar@gmail.com**

---

**वाचले:-**

१) आपत्तीव्यवस्थापनअधिनियम २००५ मधीलकलम ३४ व ५१ (b)
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र/करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडीलकरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचनाक्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
५) या कार्यालयाकडील आदेश क्र./जि.आ.व्य.पालघर/करोना विषाणू/उद्योग बंद/ओदश कावि-२४५/२० दिनांक २०/०३/२०२०
६) अर्जदार कंपनी यांचा दिनांक २१/०३/२०२० रोजीचा विनंती अर्ज/ईमेल
७) सहसंचालक उद्योग वसई,उपायुक्त कामगार बोईसर, उपअभियंता, एमआयडीसी, बोईसर, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ बोईसर यांचा दिनांक २३ /०३/ २०२० रोजीचा अहवाल.

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/उद्योग परवाना /आदेश/कावि-२५३/२० दि.२३/०३/२०२०

**आदेश**

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.२ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनानेकरोनाविषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधीलतरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

आणि ज्या अर्थी उपोद्घातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र.५ अन्वये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापणा,IT व SOFTWARE कंपन्या, तसेच त्यांना सेवा पुरविणाऱ्या आस्थापणा बंद करण्याबाबतचे आदेश निर्गमित केलेले आहेत.

आणि ज्या अर्थी **M/S. Weener Empiere Plastics Pvt. Ltd.,G-१९/३, MIDC Tarapur** यांचा दिनांक २१ /०३/२०२० रोजीचा विनंती अर्ज/ईमेल प्राप्त झाला आहे.

त्याअर्थी सदर कंपनीद्वारे देण्यात येणारी सेवा / उत्पादन विचारात घेता खालील अटी व शर्तींवर सदर कंपनीचे उत्पादन/ सेवा सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.